# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

## महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

(महाविद्यालयीन विभाग)

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली ४४२६०५(महा.) फोन:०७१३२.२१६५५४,२२३१०४,२१६५९४फॅक्स रू ०७१३२,२२३३२२

**Email : arcollegesectiongug48@gmail.com web:gondwana.digitaluniversity.ac web:gondwanauniversity.org**

(डॉ. जे. व्ही. दडवे)
संचालक (प्रभारी)

क्रमांक/महा.वि/गो.वि./२३४ /२०१६
दिनांक : १९/१२/२०१६

## परिपत्रक

सर्व संबधीतांच्या माहिती करीता कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ दि. २७.०९.२०११ रोजीच्या पत्रानुसार महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ३ पोटकलम (२) अन्वये गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली स्थापीत झालेले आहे.

या परिपत्रकाद्वारे गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या कडून प्राप्त झालेल्या पत्राची माहिती अवगत करण्याकरिता सोबत जोडलेले आहे.

कळावे,

(डॉ. जे. व्ही. दडवे)
संचालक (प्रभारी)
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतीलीपी माहितीकरिता अग्रेषित:–

१. मा.कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली
२. प्राचार्य, गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये
३. मा. अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुबंई

सहायक कुलसचिव (म.वि)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**महाराष्ट्र शासन**

<u>तात्काळ</u>

क्रमांक: संकीर्ण २०१५/प्र.क्र.४८८/१५/वि.शि.-१,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई.
दिनांक :- ०२ डिसेंबर,२०१६

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालयीन विभाग
आवक क्र. ११०१४ दिनांक ५/१२/१६
जावक क्र.............. दिनांक..............

प्रति,
संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य,
पुणे.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. २३६ दि. ३/१२/१६

विषय :- राज्यातील अशासकीय अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील प्राचार्यांच्या नियत वयोमानानुसर सेवानिवृत्तीच्या वयात वाढ करण्याबाबत.....

संदर्भ :- १) आपले पत्र क्र.युएनआय/२०१४/बीपीएड/विशि-१/७२४१,
दि.१६ जुलै, २०१६ चे पत्र.
२) आपले पत्र क्र.अमवि/२०१६/प्राचार्य वयोमर्यादा वाढ/मवि-२/९६८१,
दि.१८ ऑगस्ट, २०१६

आपल्या उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भाधीन पत्रांस अनुसरुन आपणास खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे :-

१. (i) केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय/विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक २२ जुलै, १९८८ अधिसूचनेन्वये/दि.२६ नोव्हेंबर, १९८८च्या पत्रान्वये ४ था वेतन आयोग, दिनांक २४ डिसेंबर, १९९८ च्या अधिसूचनेन्वये ५व्या वेतन आयोग, दिनांक ३१ डिसेंबर, २००८ च्या अधिसूचनेन्वये ६ व्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतन संरचना व आनुषंगिक लाभ, शैक्षणिक अर्हता, पात्रता, अनुभव इ. लागू केलेल्या आहेत. सदरच्या बाबी राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने अनुक्रमे दिनांक २७ फेब्रुवारी, १९८९, दिनांक ११ डिसेंबर, १९९९ व दिनांक १२ ऑगस्ट, २००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित शासकीय/अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्य/अध्यापकांना लागू करण्यात आलेल्या आहेत.

(ii) उच्च व तंत्र शिक्षण विभागाने केलेले सुधारित वेतन संरचनेचे व अध्यापक/प्राचार्यांच्या शैक्षणिक अर्हता, पात्रता, अनुभव इ. बाबत घेतलेले निर्णय व त्यानुषंगाने निर्गमित केलेले शासन निर्णयांचा आधार घेऊन त्यातील तरतुदी, वेतनश्रेणी, शैक्षणिक अर्हता, पात्रता जशाच्या तशा तत्कालीन क्रीडा विभागाने राज्यातील अशासकीय अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील अध्यापक/प्राचार्यांना लागू केल्याचे दिसते.

(iii) विद्यापीठ अनुदान आयोगाची दिनांक २४ डिसेंबर, १९९८ ची अधिसूचना त्याचप्रमाणे केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे दिनांक ३१ डिसेंबर, २००८ चे आदेश आणि विद्यापीठ अनुदान आयोगाची दिनांक ३० जून, २०१० च्या अधिसूचनेचे बारकाईने अवलोकन केले असता त्यामध्ये विद्यापीठातील



Shri. P. Zade
AR, BCUD
5/12/2016

संचालक/उपसंचालक/सहाय्यक संचालक, शारीरिक शिक्षण तसेच पारंपारिक महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालकांच्या बाबतीत वेतनश्रेण्या, आनुषंगिक लाभ, शैक्षणिक अर्हता, पात्रता, अनुभव इ. बाबी विहीत केलेल्या आहेत व त्याच बाबी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने त्यांच्या वर नमूद दिनांक २७ फेब्रुवारी, १९८९ व दिनांक ११ डिसेंबर, १९९९ व दिनांक १२ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयान्वये लागू केलेल्या आहेत. यावरुन विद्यापीठ अनुदान आयोगाने/केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने अथवा उच्च व तंत्र शिक्षण विभागाने अशासकीय अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील प्राचार्य/अध्यापकांसाठी कोणत्याही सुधारित वेतन संरचना, आनुषंगिक लाभ अथवा शैक्षणिक अर्हता पात्रता इ. बाबी लागू केले नसल्याचे स्पष्ट दिसून येते. परंतु केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय/विद्यापीठ अनुदान आयोग/उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वर नमूद केलेल्या कोणत्याही आदेश/अधिसूचना/शासन निर्णयामध्ये अशासकीय अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील अध्यापक/प्राचार्यांना शैक्षणिक पात्रता, अर्हता, अनुभव, वेतनश्रेण्या व आनुषंगिक लाभ इ. बाबतच्या बाबी लागू केलेल्या नसतांनाही तत्कालीन क्रीडा विभागाने त्यांचा उल्लेख करुन त्यामध्ये समाविष्ट नसलेल्या बाबी लागू केल्याचे दिसून येते.

(iv) वस्तुत: आता राष्ट्रीय अध्यापक परिषदेने दिनांक २८ नोव्हेंबर, २०१४ च्या अधिसूचनेन्वये पृ.क्र.१२९ वरील परिच्छेद क्र.५.२ (a) (b) व (c) मध्ये अशासकीय अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील अध्यापक/प्राचार्यांच्या शैक्षणिक अर्हता, पात्रता, अनुभव इ. विहीत केलेले आहेत.

(v) सदरची शैक्षणिक अर्हता, पात्रता, अनुभव राज्य शासनाने अद्याप लागू केलेली नाही.

(vi) तसेच क्रीडा विभागाने दिनांक ३१ जानेवारी, २०१३ च्या शासन निर्णयामध्ये पुढील बाबी स्पष्ट केल्या आहेत:-

(a) अशासकीय अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील अध्यापकांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेणी लागू नाहीत.

(b) त्यांच्या वेतनांवरील खर्चाकरिता केंद्र शासनामार्फत कोणतेही अर्थसहाय्य प्राप्त नसून संपूर्ण वित्तीय भार शासनाच्या अनुदानातून भागविण्यात येतो. त्यामुळे शारीरिक शिक्षण महाविद्यालये जरी उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील महाविद्यालयांना समांतर असली तरी या कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीचे वय वाढविल्यास त्याचा आर्थिक भार राज्य शासनास सोसावा लागणार आहे.

(c) त्यामुळे अशासकीय अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील अध्यापकांचे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ६० वरुन ६२ वर्षे व प्राचार्यांच्या सेवानिवृत्तीचे वय ६० वरुन ६५ वर्षे करण्याचा प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे.

२. (i) वर नमूद केलेल्या वस्तुस्थितीवरुन राज्यातील अशासकीय अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील अध्यापक/प्राचार्य हे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाहीत. तसेच या Stream चे अर्हता/पात्रताधारक अध्यापक/प्राचार्यांची कमतरता असल्याबाबतचा केंद्र शासन/राज्य शासनाची कोणत्याही अधिकृत प्राधिकरणाचा संशोधनपर अहवाल प्राप्त झालेला नाही.

(ii) वर नमूद केल्याप्रमाणे प्राचार्य/अध्यापकांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयात वाढ करण्याचा मुख्य हेतू पात्र प्राचार्य/अध्यापकांची कमतरता, सुधारित वेतन संरचनेमुळे केंद्र शासनाकडून प्राप्त होणारी प्रतिपूर्तीची रक्कम प्राप्त होणे हे असून हे दोन्ही हेतू अशासकीय अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील प्राचार्य/अध्यापकांच्या बाबतीत साध्य होत नाहीत. दिनांक १२ जुलै, २०१६ च्या शासन

निर्णयान्वये पारंपारिक महाविद्यालयांतील अध्यापकांचे सेवानिवृत्तीचे वय ६२ वरुन ६० वर्षे करण्यात आलेले आहे.

३. वर नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता अशासकीय अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयासारख्या व्यावसायिक (Professional) महाविद्यालयातील प्राचार्यांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयात वाढ करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

( विजय साबळे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी —
१) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण
२) कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे
३) संग्रहार्थ